Jagdamba Education Society's
# Santosh N. Darade Polytechnic
At.Babhulgaon, Tal.Yeola, Dist.Nashik- 423 401

Accredited by
NATIONAL BOARD OF ACCREDITATION

## * Central Library *

Please Consider the Environment Before Printing…

**Date: 08/07/2025**

# Activity Name: Day Special

## दिन विशेष


**News Paper Name: आपलं महानगर**

**Page No. 04**

आपलं महानगर | My महानगर.com
www.mymahanagar.com

## दिनविशेष

### सृजनशील लेखक गो. नी. दांडेकर



गोपाल नीलकंठ तथा गो.नी. दांडेकर यांना गोनीदा असेही म्हणतात. गोनीदा एक अनुभवसंपन्न, सृजनशील, रसिक वृत्तीचे कलावंत आणि लेखक होते. तसेच गोनीदा हे परिभ्रामक, कुशल छायाचित्रकार आणि दुर्गप्रेमीसुद्धा होते. गो. नी. दांडेकर यांचा जन्म ८ जुलै १९१६ रोजी परतवाडा (विदर्भ) येथे झाला. त्यांचे वडील शिक्षक होते. वयाच्या १२ व्या वर्षी गोनीदांनी स्वातंत्र्यलढ्यात भाग घेण्यासाठी पलायन केले. त्यासाठी त्यांनी सातव्या इयत्तेमध्ये शाळा सोडली. त्यानंतर गोनीदा संत गाडगे महाराजांच्या सहवासात आले. इतकेच नाही तर त्यानंतर ते गाडगे महाराजांचा संदेश पोहचवण्यासाठी गावोगावी हिंडले. नंतर गोनीदांनी वेदान्ताचा अभ्यास करणे सुरू केले.

पुढे ते राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे स्वयंसेवक बनले. १९४७ मध्ये गोनीदांनी लेखनकार्यावर जीवितार्थ चालविण्याचा निर्णय घेतला आणि त्यांनी पुढील आयुष्यात कुमारसाहित्य, ललित गद्य, चरित्र, कादंबरी, आत्मचरित्र, प्रवासवर्णन, धार्मिक, पौराणिक इत्यादी विविध प्रकारचे लेखन केले. त्यांच्या 'पडघवली' आणि 'शितू' या कादंबऱ्या कोकणाचे नयनरम्य चित्र डोळ्यासमोर उभे करतात. त्यांचे दुर्गभ्रमणगाथा हे महाराष्ट्रातील किल्ल्यांवरील प्रवासवर्णन प्रसिद्ध आहे. गो.नी.दांडेकर यांनी पन्नास वर्षे दुर्गभ्रमण केले. या काळात त्यांनी गडाकोटांची, त्यांवरील वास्तूंची असंख्य छायाचित्रे काढली. त्यांपैकी निवडक अशा ११५ कृष्णधवल छायाचित्रांचे एक पुस्तक 'गोनीदांची दुर्गचित्रे' या नावाने प्रकाशित झाले आहे. त्यांनी स्वतः जन्मभर दुर्गभ्रमंती करताना 'दुर्गदर्शन', 'दुर्गभ्रमणगाथा' या आपल्या पुस्तकांमधून त्यांनी दुर्गभ्रमंतीचे अनुभव शब्दबद्ध केले. मराठीतील ललित साहित्यात त्यांचे हे लेखन अगदी वैशिष्ट्यपूर्ण आहे. या लेखनामुळे हजारो माणसे दुर्गभ्रमंतीकडे आकर्षित झाली. अशा या सृजनशील लेखकाचे १ जून १९९८ रोजी निधन झाले.

Nashik Edition
Jul 08, 2025 Page No. 4
Powered by: erelego.com

S.N.D. POLYTECHNIC, BABHULGAON
CENTRAL LIBRARY
YEOLA DIST. NASHIK

LIBRARIAN
MR.U.D. MULANI
SND POLYTECHNIC
YEOLA-423401

PRINCIPAL
PROF.U.B JADHAV
SND POLYTECHNIC
YEOLA-423401